# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** पुणे शहर  **P.S.(ठाणे):** खडक
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0271  **Year (वर्ष):** 2024
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 13/08/2024 22:14

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** मंगलवार  **Date From (दिनांक पासून):** 13/08/2024
**Time Period (कालावधी):** पहर 6  **Date To ( दिनांक पर्यंत):** 13/08/2024
**Time From (वेळेपासून):** 17:00 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 17:00 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 13/08/2024  **Time (वेळ):** 22:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 025
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 13/08/2024 22:00 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
दक्षिण, 0.3 किमी  **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** शिवाजी रोडवर,वनराज रसवंती गहासमोर,खडकमाळ आळी,पुणे येथे

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with CamScanner

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** सचिन श्रीपाद कुलकर्णी

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1981

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | 446 क, शनिवार पेठ, यशोवर्धन क,हसबनिस बखळ, पुणे 30,खडक,पुणे शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | 446 क, शनिवार पेठ, यशोवर्धन क,हसबनिस बखळ, पुणे 30,हवेली, खडक,पुणे शहर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9730035927

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | माधव वसंत नाशिककर | | | 1. 604,विशाल महाराष्ट्र सोसायटी,पदमावती पुणे 9 , बिबवेवाडी,पुणे शहर,महाराष्ट्र, भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रु. |
|---|---|---|---|---|



Scanned with CamScanner

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रु. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | लाच स्विकारली | 3,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

3,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्यादी जबाब दि .13/08/2024

माझे नांव- श्री. सचिन श्रीपाद कुलकर्णी वय 43 वर्षे, व्यवसाय - नोकरी, पद - शिक्षक, नेमणुक - एच.ए. स्कुल, पिंपरी, रा. 446 क, शनिवार पेठ, यशोवर्धन क, हसबनिस बखळ, पुणे 30. मो. 9730035927

समक्ष हजर राहुन जबाब देतो की, मी वरील ठिकाणी कुटुंबासह राहत असुन पिंपरी येथे शिक्षक म्हणुन काम करुन उदरनिर्वाह करतो. दि.05/08/2024 रोजी माझी पत्नी सौ. अमृता सचिन कुलकर्णी हिचे नावे 452, शनिवार पेठ येथे समर्थ रामदास अपार्टमेंट, फ्लॅट नं. 2 -बी हा खरेदी केला आहे. सदर फ्लॅटचा दस्त हवेली क्र.1 येथे नोंदवला आहे. सदरचे दस्त नोंदवण्यासाठी कागदपत्रे तयार करण्यास मदत म्हणुन अॅड माधव नाशिककर यांची नेमणुक केली होती. सदर दस्त नोदणी करण्यासाठी स्टॅम्प डयुटी 78,000 रु., नोंदणी फी 13,000 रु व डॉक्युमेंटस हॅडलिंग चार्जेस 1,000/- रु असे एकुण 92,000/- रु अॅड माधव नाशिककर यांचे सांगणेवरुन mihika enterprises यांच्या खात्यावर एन.इ.एफ.टी दवारे ऑनलाईनरीत्या पाठविले होते. त्यानंतर दि. 05/08/2024 रोजी आमच्या दस्ताची नोंदणी झाल्यानंतर अॅड नाशिककर यांची वकिली फि म्हणुन गुगल पे दवारे 2,000/- रु व रोख 5,000/- रु अशी एकुण 7,000/- रु दिले होते. त्यावेळी अड नाशिककर यानी मला दस्त नोंदणी अधिकारी यांच्याकरीता त्यांच्या वकीली फि व्यतीरीक्त रु 5,000/- ची मागणी केली. त्यावेळी मी अॅड. नाशिककर यांना सदरच्या दस्तामध्ये कुठलेही बेकायदेशीर काम नसल्याने दस्त नोंदणी अधिकारी यांच्याकरीता मागणी केलेली 5,000/- रु रक्कम याबाबत त्यांच्याकडे जाउन विचारपुस करु असे म्हणालो होतो. त्यावेळी अॅड. नाशिककर यांनी दस्त नोंदणी अधिकारी यांचेकडे जाण्यास विरोध करुन त्यांचे व दस्त नोंदणी अधिकारी यांचे वैयक्तिक रोजचे संबध असल्याने सदरची रक्कम मीच त्यांना देणार असुन तुम्ही त्यांना न भेटता रक्कम माझ्याकडे द्या असे म्हणाले होते. यावरुन अॅड.नाशिककर मागणी करीत असलेली रक्कम ही लाच असल्याची माझी खात्री झाली असून ती देण्याची माझी इच्छा नाही. माझे व अॅड. नाशिककर यांच्यात कोणतेही अर्थिक हितसंबंध नसुन भांडणतंटा अथवा वैर नाही. सदर तक्रार मी स्व:हस्ताक्षरात लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे कार्यालय येथे समक्ष हजर राहुन दिली आहे. तरी माझ्याकडे होत असलेल्या लाच मागणी संदर्भाने आपल्या विभागाकडुन कायदेशीर कारवाई होण्यास विनंती आहे. वगैरे हकीकताची लेखी तक्रार दि.07/08/2024 रोजी अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे यांच्याकडे दिली होती.

त्यावरुन दि.07/08/2024 रोजी मी शासकीय पंचासह पडताळणी कारवाई दरम्यान अॅड श्री.नाशिककर यांची समक्ष भेट घेतली असता त्यांनी माझे दस्त नोंदणी करुन दिल्याचा मोबदला म्हणुन दुय्यम निबंधक, हवेली क्र 1 यांच्याकरीता 5,000/- रुपयाची लाच मागणी करुन तडजोडअंती रु.3000/- रुपयाची लाच मागणी केली होती. त्यावेळी मी त्यांना पैशाची तयारी करुन येतो असे कळविले होते,त्यानंतर मी अॅड.श्री.नाशिककर यांना कॉल करुन भेट घेण्याचा प्रयत्न केला परंतु ते बाहेर असलेबाबत कळविल्याने आमची भेट होवु शकली नाही.
आज दि.13/08/2024 रोजी अॅड.श्री.नाशिककर यांनी मला फोन करुन लाच रक्कम घेवुन येणे बाबत कळविले होते.त्यावरुन मी लागलीच पो.नि माने,ला.प्र.वि.पुणे यांना फोन करुन लाच रक्कम घेवुन येण्यास सांगीतले आहे



Scanned with CamScanner

असे कळवले. त्यावरुन मी ला.प्र.वि कार्यालयात हजर राहुन आज रोजी करण्यात येणा-या सापळा कारवाईसाठी लागणारी लाच रक्कम म्हणुन देणेकामी माझ्या बचतीमधील रोख रक्कम- 3,000/- रुपये लाच रक्कम म्हणुन हजर केली असता पोनि. माने यांनी सापळा कारवाईसाठी मी दिलेल्या नोटांचे क्रमांक शासकीय पंचासमक्ष लिहुन घेवुन त्यास अँथ्रसिन पावडर लावुन, सापळा कारवाईचे प्रात्यक्षीक समजावुन सांगुन तरोच सुचना देवून लाच रक्कम माझे शर्टाचे डावे खिशात ठेवण्यात आली. त्यानंतर आमचे सापळा निवेदन घेवुन मला रेकॉर्डर देवून पंचासह खाजगी इसम अँड.श्री.नाशिककर यांची भेट घेण्यासाठी दुय्यम निबंधक, हवेली क्र 1 पुणे यांचे कार्यालयात पाठविण्यात आले. सदर वेळी सापळा पथक कार्यालयाचे आजुबाजुला माझे इशा-याची वाट पहात थांबुन होते.

मी दुय्यम निबंधक, हवेली क्र 1 पुणे यांचे कार्यालयात शासकीय पंचासह अँड.श्री.नाशिककर यांनी मागणी केल्याप्रमाणे लाच रक्कम देण्यासाठी गेलो होतो. सदर ठिकाणी अँड श्री.नाशिककर हे हजर नसल्याने त्यांना फोन केला असता त्यांनी दगडुशेठ गणपती ते स्वारगेटकडे जाणा-या शिवाजी रोडवर,वनराज रसवंती गृहासमोर,खडकमाळ आळी येथे येण्यास सांगीतले. सदर ठिकाणी जावुन मी त्यांची भेट घेतली असता आमचे मध्ये दुय्यम निबंधक, हवेली क्र 1 येथे नोंदविण्यात आलेल्या दस्ताबाबत चर्चा झाली. त्यावेळी मी त्यांना दुय्यम निबंधक साहेबांना जे मागीतले आहेत ते मी आणलेत त्यावर अँड नाशिककर यांनी नाय तु सगळे पैसे दे, आणि डॉक्युमेंट घेवुन जा,एक रकमी दे सगळे ,आणि कधी पाहीजे तेंव्हा डॉक्युमेट घेवुन जा असे म्हणाले असता त्यावर मी म्हणालो की, मग काय करतो दुय्यम निबंधक साहेबांनी मागीतले होते ना, तुम्ही जे तीन हजार रुपये ,ते तुम्हाला मी आत्ता कॅश देतो, तुम्ही त्यांना दया, नाहीतर काहीही करा, त्यावर अँड नाशिककर म्हणाले की, नाय नाय, ते तर दिलय त्यांना मी असे म्हणाले असता आमच्यात इतर चर्चा झाल्याने मी माझ्या शर्टाचे खिशातील लाच रक्कम उजव्या हाताने काढुन त्यांचेसमोर धरुन हे घ्या,मोजुन घ्या,साहेबांना दयायचेत ते असे म्हणालो असता त्यांनी ती उजव्या हाताने स्विकारुन लाच रक्कम मोजुन घेवुन त्यांचे पँटचे मागील उजव्या खिशात ठेवली. त्यावेळी त्यांनी मला ते तर मी देवुन टाकले साहेबांना, असे म्हणुन लाच रक्कम स्विकारुन माझे दस्त नोंदणीचे कागदपत्र मला दिली आहेत. त्यानंतर मी नियोजीत इशारा केल्याने सापळा पथकाने अँड.श्री.नाशिककर यांना ताब्यात घेतले आहे. सदर वेळी शासकीय पंचासमक्ष लाच रक्कम हस्तगत करण्यात आली असुन त्याची शासकीय कॅमेरामध्ये त्याची व्हिडीओ रेकॉर्डीग करण्यात आलेली आहे.याबाबतचे सविस्तर पंचनामे व स्क्रिप्ट पंचासमक्ष करण्यात आलेले आहेत.

तरी मी दिलेल्या तक्रारीवरुन करण्यात आलेल्या पडताळणी व सापळा कारवाई वरुन खाजगी इसम अँड श्री. माधव वसंत नाशिककर वय.61 धंदा.वकील रा. 604,विशाल महाराष्ट्र सोसायटी, पदमावती पुणे 9 यांनी दस्त नोंदणी करुन दिल्याचा मोबदला म्हणुन दुय्यम निबंधक, हवेली क्र 1 पुणे यांच्याकरीता 5,000/- रुपयाची लाच मागणी करुन तडजोडअंती रु.3000/- स्विकारण्याचे मान्य करुन रु.3000/- अशी लाच रक्कम स्विकारली आहे. म्हणुन माझी त्यांचे विरुध्द फिर्याद आहे.

माझी वरील फिर्याद माझे सांगणेप्रमाणे टंकलिखीत करण्यात आली असुन ती मी वाचुन पाहिली असता बरोबर व खरी लिहीली आहे.

तपासी अधिकारी -श्री. विरनाथ माने, पोलीस निरीक्षक, लाप्रवि पुणे



Scanned with CamScanner

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र. २ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

shashikant bharat chavan(I (Inspector)) / DGPSBCM7202

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव): **or** (किंवा)

**Rank** (पद):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा) **No.**(क्र.):

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.** (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): shashikant bharat cl
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): DGPSBCM7202



Scanned with CamScanner